खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०६ | अंक : ९४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१६ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

महाराष्ट्रात दिवसा उकाडा, रात्री गारवा; नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१५, मुंबई : राज्यभरात किमान आणि कमाल तापमानातील तफावत वाढू लागली आहे. कोकण विभागात कमाल तापमानाच्या पाऱ्यात किंचित घट झाली असली, तरी उर्वरित महाराष्ट्रात किमान तापमान उतरले आहे. कम ाल तापमान अजूनही ३० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. परिणामी, सकाळी आणि रात्री वातावरणात गारवा जाणवत असला, तरी दुपारच्या वेळी उन्हाचा चटका कायम आहे.

राज्याच्या बहुतांश भागांत किमान तापम ानात घट होत असताना कमाल तापमानात मात्र अपेक्षित घसरण झालेली नाही. विशेषतः कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात कमाल आणि किमान तापमानातील मोठी तफावत जाणवत आहे. याम ुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. या तफावतीमुळे मुख्यत्वे सर्दी-खोकल्याचे प्रम ाण वाढू शकेल, असे प्रादेशिक हवामान केंद्राचे प्रमुख बिक्रम सिंह यांनी नमूद केले.

मुंबईमध्ये सांताक्रूझ येथे शनिवारी किमान २० अंश नोंदले गेले, तर कुलाबा येथे २४ अंश सेल्सिअस किमान तापमान होते. कमाल तापमान सांताक्रूझ येथे ३४.९, तर कुलाबा येथे ३४.७ अंश सेल्सिअस होते. सांताक्रूझ येथे दिवसा आणि रात्रीच्या तापमानातील फरक १४.९ अंश सेल्सिअस होता. उर्वरित महाराष्ट्रात प्रामुख्याने मध्य महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा १५ अंशांखाली उतरला आहे, तर कमाल तापमान ३० अंशांच्या वर आहे.

पुणे येथे किमान तापमान १३.९ तर कमाल तापमान ३१.८ अंश सेल्सिअस होते. येथील दोन्ही तापमानात १८.३ अंश सेल्सिअस फरक नोंदवला गेला. जळगाव येथे किमान १३.५, तर कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस होते. येथे हा फरक १९.५ अंश इतका नोंदवला गेला. सोलापूर येथेही कमाल तापमान ३४.२ तर किमान तापमान १६.९ अंश सेल्सिअस होते. हा फरक १७.३ अंश नोंदवला गेला. मराठवाड्यात धाराशीव येथे किमान १६, तर कमाल तापमान ३३.३ अंश सेल्सिअस होते. येथे हा फरक १७.३ अंश नोंदवला गेला. तर छत्रपती संभाजीनगर येथे कमाल तापमान ३३.५ आणि किमान तापमान १५.२ अंशांसह १८.३ अंश सेल्सिअस असा फरक नोंदवला गेला.



पुण्यात पुढील दोन दिवस तापमानात घट होण्याची शक्यता...

थंडीची आतुरतेने वाट बघणाऱ्या पुणेकरांना शनिवारी पहाटेपासून आल्हाददायक गारवा अनुभवायला मिळाला. सलग दुसऱ्या दिवशी पारा घसरल्याने पुण्यात या हंगामातील नीचांकी १३.९ अंश सेल्सिअस तापमान नोंदविण्यात आले. दहा वाजले तरी हवेत गारवा होता. पुढील दोन दिवस तापमानात अजून घट होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे.

शहर आणि परिसरात गेल्या आठवडाभरापासून चढ उतार सुरू आहेत. गेल्या आठवड्यात कमाल तापमानात घट झाली होती; पण किमान तापमान स्थिर होते. शनिवारी पहाटे काही भागात हुडहुडी भरणारी थंडी जाणवली, तर काही ठिकाणी आल्हाददायक वातावरण होते. दिवसाच्या तापमानातही घट नोंदविण्यात आली. दुपारी वारे सुटले होते, त्यामुळे उन्हाचा कडाका जाणवला नाही, संध्याकाळनंतर हवेत गारवा वाढत गेला. मध्यवर्ती पुण्यापेक्षा उपनगरात अधिक गारठा जाणवला.

शहरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा अनुभव येत असला, तरी कमाल तापमानात वाढ झाल्याने दुपारच्या वेळी उन्हाचा चटका जाणवत आहे. सकाळी आणि रात्री गारवा, तर दुपारी उन्हाचा चटका असे संमिश्र वातावरण सध्या शहरात अनुभवायला मिळत आहे. मात्र, किमान तापमानातील संभाव्य घटीमुळे थंडीची तीव्रता पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए), हवेली, सिंहगड रस्ता, पाषाण भागात तापमान कमी होते, तर पुण्यात दिवसभरात कमाल ३१.८ आणि किमान १३.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. लोहगाव, वडगावशेरी, हडपसर, मगरपट्टा भागात तापमान जास्त होते.

एमडी ड्रग्जसह दोघांना अटक १९.२२० ग्रॅम एमडी पावडर जप्त

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१५, चंद्रपूर : अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व तस्करीविरोधात चंद्रपूर शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत आनंदनगर, महाकाली कॉलरी परिसरातील एका घरातून एम.डी.(मेफेड्रोन) ड्रग्जचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत १९.२२० ग्रॅम वजनाचे, अंदाजे ४२ हजार २८४ रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

प्राप्त माहितीनुसार,१२ नोव्हेंबर २०२६ रोजी शहर पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे एनडीपीएस कायद्याच्या तरतुदींनुसार आनंदनगर, महाकाली कॉलरी, चंद्रपूर येथील शुभम संजय वासेकर (वय २४) आणि संजय महादेव वासेकर (वय ५२), यांच्या निवासस्थानी झडती घेण्यात आली. या झडतीदरम्यान १९.२२० ग्रॅम निव्वळ वजनाचे एम.डी. (मेफेड्रोन) ड्रग्स आढळून आले. त्याची किंमत ४२ हजार २८४ रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध शहर पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्याम गव्हाणे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत सपोनि. कृणाल रामटेके, पोउपनि.दत्तात्रय कोलटे, पोहवा.संजय धोटे, संतोष दंडेवार, नापोअं.कपूरचंद खरवार,पोलीस अंमलदार योगेश पिदूरकर, खंडेराव माने, निलेश ढोक, विक्रम मेश्राम, प्रशांत कुसारे, सुशांत घिवे आणि मपोअं. लीना काटवले, यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दिवाळीचा आनंद क्षणात हिरावला! १२ वर्षीय चिमुरडीचा विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू

अक्षराज : सुनील क्षिरसागर



दि.१५, विंचूर (नाशिक) : निफाड तालुक्यातील गोंदेगाव येथील अवघ्या १२ वर्षीय चिमुरडीचा नांदगाव तालुक्यातील जामदरी येथे विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची अत्यंत हृदयद्रावक घटना रविवारी (दि. १५) सकाळी घडली. कु. पूजा भरत भोसले (वय १२, रा. गोंदेगाव, ता. निफाड) असे मृत बालिकेचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गोंदेगाव व जामदरी परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

घटना कशी घडली? : प्राप्त माहितीनुसार, कु. पूजा भोसले ही दिवाळीच्या सुट्टीनिमित्त नांदगाव तालुक्यातील जामदरी येथील आपल्या मामाच्या गावी गेली होती. रविवारी सकाळी सुमारे नऊ वाजेच्या सुमारास ती आपल्या बहिणीसोबत मामाच्या घरामागील विहिरीवर धुणे धुण्यासाठी गेली होती. यादरम्यान अचानक पाय घसरून किंवा तोल जाऊन पूजा विहिरीत पडल्याने ही दुर्घटना घडली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच तारांबळ उडाली आणि खळबळ उडाली.

पोलीस प्रशासनाकडून तपास सुरू : या दुर्दैवी घटनेत चिमुकल्या पूजाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी नांदगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पोलीस उपनिरीक्षक/अधिकारी पुढील कायदेशीर कार्यवाही करत आहेत.

दिवाळीच्या आनंदाच्या वातावरणात मामाच्या गावी गेलेल्या हसत्याखेळत्या चिमुरडीचा अशा प्रकारे अकाली अंत झाल्याने भोसले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

घरफोडीतील दोघांना नागपुरातून अटक ! ३०.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१५, वरोरा (चंद्रपूर) : बंद घराची रेकी करुन संधी साधत लाखोंचा ऐवज लंपास करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना वरोरा पोलिसांनी अटक केली. लग्नसमारंभासाठी घरातील मंडळी मुंबईला गेल्याची संधी साधून चोरट्यांनी घराचे कुलूप तोडत सोन्या- चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरी केली होती. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी फ ूटप्रिंट, सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. त्यांच्याकडून ३० लाख ३५ हजार १९८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात आरोपी सत्येंद्र उर्फ राहुल राजबहादूर गुप्ता ४१ वर्ष, रा. बाबा दिवाण मशिदजवळ, यशोधरानगर, नागपूर आणि प्रेम शालिकराम खत्री ३५ वर्ष रा. नौकन्या नगर, नागपूर या दोघांना १० नोव्हेंबर रोजी अटक केली. दोन्ही आरोपी नागपूर येथील रहिवासी असून, त्यांच्याकडून चोरीचा बहुतांश ऐवज हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

वरोरा येथील हनुमान व्यायामशाळेजवळ राहणाऱ्या समीना अलीअसगर बोहरा या १ नोव्हेंबर रोजी कुटुंबासह लग्नसमारंभासाठी मुंबईला गेल्या होत्या. घराला कुलूप असल्याची संधी साधून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून बेडरूममधील लोखंडी कपाट



फोडण्यात आले. त्यातील लॉकरमधून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा २६ लाख १० हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. ५ नोव्हेंबर रोजी घरी परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

घर पाच दिवस बंद असल्याने चोरीची नेमकी वेळ निश्चित करणे कठीण होते. मात्र, वरोरा पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने घटनास्थळावरील प्रत्येक पुराव्याची बारकाईने तपासणी केली. यावेळी घराच्या आवारातील लोखंडी गेटवर चपलांच्या तळव्यांचे ठसे आढळले. त्यानंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मध्यरात्रीच्या सुमारास एक कार संशयास्पदरीत्या फिरताना दिसली. पोलिसांनी या कारचा माग काढत आरोपींपर्यंत पोहोचण्याची मोहीम राबवली. अखेर तांत्रिक तपास आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे दोघांना अटक करण्यात आली.

आरोपींकडून २१०.६५ ग्रॅम सोन्याचे दागिने, ५४.३८ ग्रॅम चांदीचे शिक्के व डबी, २५ हजार रुपये रोख, दोन अँड्रॉइड मोबाईल आणि एक साधा मोबाईल असा एकूण ३० लाख ३५ हजार १९८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळी मिळालेले चपलांचे ठसे आरोपींच्या चपलांशी जुळले, तर सीसीटीव्हीमध्ये दिसणाऱ्या टी-शर्टशी संबंधित कपडाही पोलिसांनी जप्त केला. त्यामुळे या घरफोडीचा छडा लावण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार ओमप्रकाश सोनटक्के यांचा नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दहीफळे, गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक मनीष तालेवार, पोलीस हवालदार संदीप मुळे, प्रशांत नागोसे, विशाल राजुरकर, मनोज ठाकरे, अमोल नवघरे, सुखशान यादव, महेश गावतुरे आणि सौरभ कुलथे यांनी केले.

देशातील प्रथम क्रमांकाच्या यशात पत्रकारांचे योगदान कौतुकास्पद : उपमहापौर दशरथ भगत

अक्षराज : जे. के. पोळ

दि.१५, नवी मुंबई : महानगरपालिकेला देशातील सर्वप्रथम क्रमांकाच्या सर्वोत्तम स्वच्छ शहराच्या मिळालेल्या बहुमानामध्ये नवी मुंबईतील प्रत्येक घटकाचे अनमोल योगदान असून प्रत्येकजण आपापल्या स्तरावर आपल्या योगदानाचा आनंद उत्सव साजरा करीत आहे. यामध्ये नवी मुंबईतील पत्रकारांनी एकत्र येत आपण यासाठी दिलेल्या योगदानाचा आनंद उत्सव साजरा करण्याचे ठरविले ही गोष्टच कौतुकास्पद असल्याचे मत नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केले. अशाच प्रकारे प्रथम क्रमांकासाठी आपण दिलेल्या योगदानाचा आनंदोत्सव शहरातील प्रत्येक घटकाने, संस्था, संघटना, मंडळांनी आपापल्या पातळीवर साजरा करायला हवा असे आवाहन उपमहापौरांनी नागरिकांना केले.

नवी मुंबईस देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहराचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार लाभला त्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी महापालिका मुख्यालयामधील पत्रकार कक्षात विविध वृत्तपत्र, वृत्तचित्रवाहिनी प्रतिनिधींच्या वतीने पुरस्काराचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपमहापौर दशरथ भगत, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे, जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजूसिंह चव्हाण आणि नरेश अंधेर, अभियंता वैभव देशमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमहापौरांनी देशात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला मात्र तो टिकविण्याची अत्यंत महत्वाची जबाबदारी यापुढील काळात आपली सर्वांची असल्याचे सांगितले. या यशाचे आपण केवळ साक्षीदार नाही तर



भागीदार आहोत त्यामुळे आपलेही योगदान या पुरस्कारात आहे ही भावनाच आपल्या प्रत्येकासाठी मोठी असल्याचे ते म्हणाले. सुगंधी शहर अभियानाच्या माध्यमातून प्रत्येकाने आपल्या घरापुढील, इमारतीपुढील भाग दत्तक घेऊन त्यावर लक्ष द्यावे यातूनच शहरात सक्षम जनसहभाग चळवळ उभी राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्रथम क्रमांकाच्या या यशामध्ये नवी मुंबईतील पत्रकारांचे योगदान मोठे असल्याचे सांगितले. पत्रकारांमार्फत स्वच्छतेचा संदेश तसेच स्वच्छताविषयक विविध कार्यक्रम, उपक्रम नागरिकांपर्यंत पोहचविण्याला बळ मिळाले तसेच वेळोवेळी दाखवण्यात येणाऱ्या स्वच्छतेमधील त्रुटींमुळे अधिक चांगले काम करता आले, याचाही पुरस्कारामध्ये मोठा वाटा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या पुरस्कारामुळे नागरिकांना आनंद आणि अभिमान वाटण्यासोबतच यापुढील काळात हा क्रमांक कायम टिकविण्याची मोठी जबाबदारी प्रत्येकाची असल्याची जाणीव निर्माण होईल असा विश्वास असल्याचे ते म्हणाले. दिल्लीतील पुरस्कार वितरण सम ारंभप्रसंगी उपस्थित असताना इतर शहरांना नवी मुंबईविषयी वाटणारी कौतुकाची भावना काही उदाहरणे देत त्यांनी सांगितली.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी पत्रकारांचे नेहमीच मिळणारे अभिप्राय, सूचना यांचा फार मोठा उपयोग स्वच्छताविषयक तत्पर कार्यवाहीसाठी होतो असे सांगत यापुढील काळात एकत्र मिळून अधिक जोमाने काम करू आणि पहिला नंबर कायम राखण्यासाठी प्रयत्न करू असे प्रतिपादन केले.

यावेळी पत्रकारांच्या वतीने दिनेश पाटील, प्रवीण पुरो, मनोज जालनावाला, विनय म्हात्रे, मच्छिंद्र पाटील, विनायक पाटील, सुधीर शर्मा, ज्ञानेश्वर जाधव, प्रथमेश गडकरी, मनिषा ठाकूर, मोनिका भोसले, अर्चना त्रिपाठी, संध्या शीवास्तव, रूपाली वाघमारे यांनी मनोगते व्यक्त करीत नवी मुंबईला मिळालेल्या देशातील पहिल्या क्रमांकाच्या स्वच्छता पुरस्काराचा आनंद व्यक्त करण्यासाठी या अनौपचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. ज्या शहरात आपण राहतो त्या शहराचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान होणे ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची गोष्ट असून या पुरस्कारामध्ये प्रत्येकाचा खारीचा वाटा आहे. तसाच तो पत्रकारांचाही आहे. त्यामुळे या पुरस्कारासाठी पत्रकारांनी दिलेल्या योगदानाचा आनंद एकत्र येऊन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी पुरस्कार मिळवून देण्यामध्ये ज्यांच्या कार्याचे सर्वाधिक योगदान आहे अशा स्वच्छताकर्मींचा कृतज्ञता व्यक्त करीत प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात आला.



दुधाच्या राजकारणातील काळेबेरे

जगात सर्वाधिक पशुधन आणि सर्वाधिक दूध उत्पादन असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. दूध व्यवसायाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा आधार दिला आहे. पण या उद्योगाचे महत्त्व केवळ अर्थकारणापुरते मर्यादित नाही. ग्रामीण भागातील राजकीय सत्ता, स्थानिक नेतृत्व, सहकारी संस्था आणि मतदारांवरील प्रभाव या सगळ्यांच्या केंद्रस्थानी दूध संघांचे राजकारण आहे. म्हणूनच सहकारावर पकड मिळवणे म्हणजे ग्रामीण राजकारणाच्या चाव्या हातात ठेवणे, हे सर्वच राजकीय पक्षांनी ओळखले आहे. भाजपनेही आता दूध संघांच्या राजकारणात विशेष रस दाखवायला सुरुवात केली आहे. साखर कारखानदारीनंतर आता दूध संघांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी महायुतीसह विविध पक्षांचे प्रयत्न वाढले आहेत. कोल्हापूरचा गोकुळ दूध संघ हे त्याचे ठळक उदाहरण आहे. गोकुळचे राजकारण केवळ कोल्हापूर जिल्ह्यापुरते मर्यादित राहिले नाही; ते महाराष्ट्रातच नव्हे, तर देशपातळीवर चर्चेचा विषय बनले. यावरून आगामी काळात महायुती दूध संघांवर विविध मार्गांनी वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करेल, हे स्पष्ट दिसते.

देशात 'एनडीडीबी'च्या माध्यमातून दूध संघांवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. त्यासाठी सरदार पटेल मिल्क फेडरेशनची स्थापना झाल्याचे सांगितले जाते. देशभरातील दूध संस्था एनडीडीबी, मदर डेअरी किंवा नव्या फेडरेशनच्या नियंत्रणाखाली आणण्याचा डाव असल्याची टीका केली जाते. भाजप मात्र हा आरोप फ ेटाळतो. त्यांच्या मते, हा दूध उद्योग अधिक संघटित, सक्षम आणि स्पर्धात्मक करण्याचा प्रयत्न आहे. दोन्ही बाजू आपापले मुद्दे मांडत आहेत. मात्र, प्रश्न एवढाच आहे की या प्रक्रियेमागे केवळ व्यावसायिक सुधारणा आहेत की राजकीय नियंत्रणाचाही मोठा हेतू दडलेला आहे? गुजरातमधील अमूलचा नमुना यशस्वी मानला जातो. 'एक गाव, एक डेअरी', त्यावर जिल्हा संघ आणि पुढे राज्यस्तरीय संघ अशी साखळी तिथे उभी राहिली. याउलट महाराष्ट्रासह अनेक राज्यांत एका गावात अनेक दूध संस्था निर्माण झाल्या. त्यातून दूध संकलन फार वाढले नाही; पण स्थानिक राजकारणात तीव्र स्पर्धा निम र्ण झाली. देशात अमूलनंतर महाराष्ट्रातील गोकुळची चर्चा अधिक होते. कर्नाटकात नंदिनी, तामिळनाडूत अविन, राजस्थानमध्ये सरस, बिहारमध्ये सुधा, हरियाणात विटा आणि पंजाबमध्ये वेर्का असे राज्यनिहाय ब्रँड मजबूत झाले. महाराष्ट्रात मात्र महानंद हा राज्याचा ब्रँड असला तरी त्याची ताकद कमी होत गेली.

एकेकाळी महानंद चांगला चालत होता. पण पुढे दूध संकलन कमी झाले, आर्थिक गणित बिघडले आणि राज्य सरकारने हा संघ स्वतः सक्षमपणे चालविण्याऐवजी एनडीडीबीकडे दिला. इथेच राजकारण सुरू झाले. एनडीडीबीचा संबंध गुजरातशी जोडला जात असल्याने विरोधकांनी आरोप केला की महानंद गुजरातच्या दावणीला बांधला गेला. गोकुळलाही त्याच मार्गावर नेण्याचा प्रयत्न होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. अमूलला तमिळनाडू आणि कर्नाटकात स्थानिक सरकारांनी जोरदार विरोध केला. महाराष्ट्रात मात्र अमूल राज्यभर विस्तारत आहे. गोकुळ वगळता इतर सक्षम सहकारी दूध संस्था कमी असल्याने या विस्ताराला ठोस विरोध दिसत नाही. पश्चिम महाराष्ट्रातही अमूलने आपले जाळे मजबूत केले आहे. या भागातून सुमारे पाच लाख लिटर दूध संकलित होत असल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे गोकुळ दररोज साधारण १६ ते २० लाख लिटर दूध संकलन करतो. त्यामुळे अमूलची वाढ गोकुळसाठी थेट आव्हान ठरू शकते. ही स्पर्धा आता व्यावसायिक राहिलेली नाही; ती पक्षीय राजकारणाच्या पातळीवर पोहोचली आहे.

गोकुळ दूध संघाचे राजकारण गेल्या काही महिन्यांत प्रचंड तापले. सुमारे साडेचार हजार कोटींची वार्षिक उलाढाल, साडेपाच लाख दूध उत्पादक आणि दर दहा दिवसांनी शंभर कोटी रुपयांची बिले शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणारा हा संघ आहे. गोकुळवर पकड म्हणजे कोल्हापूरच्या राजकारणावर प्रभाव, हे सर्वांना माहीत आहे. म्हणूनच महायुतीचे नेते एकत्र आले, तर सतेज पाटील यांनी त्यांच्या विरोधात कडवी लढत दिली. निवडणुकीत पाटील गटाचे १३ आणि महायुतीचे १२ संचालक निवडून आले. बहुमत काँग्रेसप्रणित आघाडीच्या बाजूने असतानाही राज्य सरकारने चार शासकीय संचालक नियुक्त करून त्यांना मतदानाचा अधिकार दिला. त्यानंतर गोकुळचा चेअरमन महायुतीचा झाला. विरोधकांच्या मते, हा मागच्या दाराने सत्ता हस्तगत करण्याचा प्रकार होता. त्यामुळे लोकशाहीचा खून झाल्याचा आरोप झाला.

-गुरुबाळ माळी

मराठी रंगभूमीचा नटसम्राट डॉ. श्रीराम लागू!

मराठी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटविणारे, आपल्या दमदार आवाजाने आणि कसदार अभिनयाने असंख्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांची आज, १६ नोव्हेंबर रोजी ९९ वी जयंती. १६ नोव्हेंबर १९२७ रोजी जन्मलेल्या डॉ. श्रीराम लागू यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. अभिनय, रंगभूमी, चित्रपट आणि सामाजिक विचारांच्या क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे.

डॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू यांचा जन्म सातारा येथे झाला. त्यांचे बालपण साताऱ्यात गेले. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर फर्ग्युसन महाविद्यालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. ते कान, नाक आणि घसा यांचे तज्ज्ञ शल्यचिकित्सक होते. वैद्यकीय व्यवसाय करत असतानाच त्यांच्यातील कलावंतही सतत जागा होता. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांना नाटकाची आवड होती. भालबा केळकर यांच्यासारख्या सहकाऱ्यांसोबत त्यांनी प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून नाट्यक्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली.

वैद्यकीय व्यवसाय आणि नाटक या दोन्ही आघाड्यांवर काम करताना त्यांनी अभिनयाची आवड जपली. मात्र, अभिनय हेच आपले जीवन असल्याची जाणीव झाल्यानंतर १९६९ मध्ये वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांनी वैद्यकीय व्यवसायाला रामराम ठोकून पूर्णवेळ अभिनयक्षेत्रात प्रवेश केला. वसंत कानेटकर लिखित 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकातून त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले.

डॉ. लागू यांच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वाधिक गाजलेली भूमिका म्हणजे कुसुमाग्रज लिखित 'नटसम्राट' या नाटकातील गणपतराव बेलवलकर अर्थात आप्पासाहेब बेलवलकर! या भूमिकेने त्यांना मराठी रंगभूमीवर अढळ स्थान मिळवून दिले. एका महान नटाच्या आयुष्यातील चढ-उतार, कुटुंबातील नात्यांमधील गुंतागुंत, वृद्धापकाळातील एकाकीपणा आणि आयुष्याच्या अखेरीस वाट्याला आलेली शोकांतिका त्यांनी आपल्या अभिनयातून अत्यंत प्रभावीपणे साकारली. या नाटकातील त्यांची पल्लेदार स्वगते, संवादफेक, देहबोली आणि आवाजातील चढ-उतार प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवत असत. त्यांनी आप्पासाहेब बेलवलकर ही व्यक्तिरेखा केवळ रंगमंचावर साकारली नाही, तर ती जिवंत केली. त्यामुळेच 'नटसम्राट'मधील त्यांची भूमिका मराठी रंगभूमीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरली.

'हिमालयाची सावली', 'काचेचा चंद्र', 'उद्ध्वस्त धर्मशाळा', 'एकच प्याला', 'गार्बो' अशा अनेक नाटकांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे प्रेक्षकांसमोर आणली. गंभीर, विनोदी, भावनिक आणि वैचारिक अशा विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी तितक्याच ताकदीने साकारल्या.

चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटविला. व्ही. शांताराम दिग्दर्शित 'पिंजरा' या चित्रपटाने त्यांना मराठी चित्रपटसृष्टीत विशेष लोकप्रियता मिळवून दिली. 'सामना', 'सिंहासन', 'मुक्ता' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी काम केले. 'घरौंदा', 'लावारिस', 'मुकद्दर का सिकंदर', 'एक दिन अचानक' यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका उल्लेखनीय ठरल्या. रिचर्ड ॲटनबरो यांच्या



'गांधी' या आंतरराष्ट्रीय चित्रपटात त्यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांची भूमिका साकारली होती. मराठी आणि हिंदी चित्रपटांसह विविध भाषांतील चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या अभिनयाची छाप उमटवली.

अभिनयाबरोबरच दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही त्यांनी काम केले. पत्नी दीपा लागू यांच्या निर्मितीतील 'झाकोळ' या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. अभिनयाच्या क्षेत्रात यशाची शिखरे गाठतानाच त्यांनी सामाजिक आणि वैचारिक भूमिका घेण्याचेही धाडस दाखविले.

डॉ. श्रीराम लागू हे केवळ अभिनेते नव्हते, तर ते विज्ञाननिष्ठ, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी विचारांचे समर्थक होते. ते निरीश्वरवादी होते. 'देवाला रिटायर करा' या त्यांच्या विधानाने एकेकाळी सम ाजात मोठी चर्चा आणि खळबळ उडाली होती. अंधश्रद्धा, कर्मकांड आणि समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांवर त्यांनी परखड भाष्य केले. अंधश्रद्धा निम ूलनाच्या चळवळीशीही त्यांचा जवळचा संबंध होता. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांशी त्यांची वैचारिक जवळीक होती. कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या अभिनयासाठी आणि रंगभूमीवरील योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९७८ मध्ये हिंदी चित्रपट 'घरौंदा'साठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. संगीत नाटक अकादमीची फेलोशिप यांसारखे सन्मानही त्यांना प्राप्त झाले.

१७ डिसेंबर २०१९ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील एका महान पर्वाचा अस्त झाला. मात्र, त्यांनी साकारलेल्या भूमिका, त्यांचे अजरामर संवाद आणि त्यांचे निर्भीड विचार आजही रसिकांच्या स्मरणात आहेत.

आजच्या पिढीतील कलाकारांसाठी डॉ. श्रीराम लागू यांचे जीवन म्हणजे अभिनयातील निष्ठा, मेहनत, अभ्यास आणि वैचारिक स्पष्टता यांचा वस्तुपाठ आहे. त्यांनी साकारलेला 'नटसम्राट' आजही प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवतो. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कलाकृतींचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मराठी रंगभूमीचा हा नटसम्राट काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी आपल्या अभिनयाच्या सामर्थ्याने तो रसिकांच्या मनात कायम अजरामर राहील!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

राष्ट्रवादी पक्ष पुन्हा दुभंगणार...?

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष म्हणजे म्हणजे अनेक वर्षांच्या सत्तासंघर्षाचा, महत्त्वाकांक्षांचा, बेरजेच्या राजकारणाचा आणि पवार नावाच्या प्रभावी राजकीय वर्तुळाचा केंद्रबिंदू आहे. या पक्षाने राज्याच्या राजकारणाला अनेकदा कलाटणी दिली. सत्तेसाठी तडजोडी केल्या, सत्तेच्या विरोधात बंड पुकारले आणि पक्षाच्या अस्तित्वासाठी संघर्षही केला.

मात्र, आता पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार गटातील २० ते २२ आमदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याचा दावा करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. राऊत यांचा हा दावा केवळ राजकीय टोलेबाजी समजून दुर्लक्षित करायचा की त्यामागे राष्ट्रवादीच्या अंतर्गत अस्वस्थतेचे काही संकेत दडले आहेत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये यापूर्वी





झालेली फूट महाराष्ट्राने अनुभवली आहे. शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि अनुभवी नेत्याच्या नेतृत्वाला आव्हान देत अजित पवार यांनी आपल्या समर्थक आमदारांसह वेगळी राजकीय वाट धरली. पक्ष, चिन्ह आणि नेतृत्व यावरून संघर्ष उभा राहिला. सत्तेच्या सम ीकरणात अजित पवार गटाला स्थान मिळाले; मात्र या सगळ्या घडामोडींनी राष्ट्रवादीच्या मूळ संघटनात्मक बांधणीला मोठा धक्का बसला. दोन गट निर्माण झाले, दोन नेतृत्वे उभी राहिली आणि एकाच राजकीय विचारधारेचा वारसा सांगणारे नेते परस्परांच्या विरोधात उभे ठाकले.

आता अजित पवार यांच्या नेतृत्वाची पोकळी निर्माण झाल्यानंतर या दोन्ही गटांच्या भवितव्याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. अशा परिस्थितीत राऊत यांनी केलेला २० ते २२ आमदारांच्या संभाव्य पक्षांतराचा दावा महत्त्वाचा ठरतो. राऊत यांच्या म्हणण्यानुसार, सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमधील २० ते २२ आमदार पक्ष सोडण्याच्या मानसिकतेत आहेत. हे आमदार शरद पवार यांची भेट घेत आहेत, ती केवळ सदिच्छा भेट नसून त्यामागे राजकीय गणिते आहेत. या आमदारांपुढे दोन पर्याय असल्याचेही राऊत यांनी सूचित केले आहे. एकतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील मूळ राष्ट्रवादीत परतायचे किंवा आगामी निवडणुकांपूर्वी अन्य पक्षांचा मार्ग स्वीकारायचा. विशेष म्हणजे, मूळ पक्षात परतण्याला विलीनीकरण म्हणता येणार नाही, अशीही भूमिका त्यांनी मांडली आहे. अर्थात, हा राऊत यांचा राजकीय दावा आहे. संबंधित आमदारांनी अद्याप सामूहिक पक्षांतराची अधिकृत घोषणा केलेली नाही. त्यामुळे या विधानाला अंतिम सत्य मानण्यापेक्षा राष्ट्रवादीच्या अंतर्गत राजकारणाचा एक संभाव्य इशारा म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. मात्र, राऊत यांच्या विधानातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा आमदारांच्या संख्येपेक्षाही नेतृत्वाचा आहे. अजित पवार यांच्याकडे निर्णयक्षमता, संघटन कौशल्य, सत्तेची समीकरणे जुळवण्याची हातोटी आणि आमदारांना एकत्र ठेवण्याची ताकद होती. राजकीय विरोधकांशी दोन हात करतानाही स्वतःच्या गटातील नेत्यांना विश्वासात घेण्याची त्यांची पद्धत होती. त्यांच्या अनुपस्थितीत सुनेत्रा पवार यांच्यासमोर पक्षाची सूत्रे सांभाळण्याबरोबरच नेत्यांचा विश्वास संपादन करण्याचे मोठे आव्हान आहे.

राजकारणात सहानुभूतीची लाट काही काळ साथ देऊ शकते; परंतु पक्ष टिकवण्यासाठी संघटनात्मक पकड, राजकीय संवाद आणि निर्णयांमध्ये सहभागी करून घेण्याची क्षमता आवश्यक असते. दुसरीकडे, शरद पवार यांच्यासाठीही ही परिस्थिती राजकीय संधी आणि कसोटी अशा दोन्ही स्वरूपांची आहे. ज्यांच्या नेतृत्वाला आव्हान देऊन अजित पवार यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, त्याच गटातील आमदार पुन्हा शरद पवारांकडे वळले तर तो त्यांच्या राजकीय प्रभावाचा मोठा पुरावा ठरेल. मात्र, घरवापसीचा मार्ग तितका सोपा नाही. पूर्वी पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांना पुन्हा सामावून घेताना जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या भावनांचा विचार करावा लागेल. सत्तेच्या समीकरणात सहभागी असलेल्या आमदारांना पुन्हा विरोधी राजकारणात आणणेही सोपे नाही.

त्यामुळे शरद पवार यांच्यासमोर केवळ आमदारांची संख्या वाढवण्याचे नव्हे, तर पक्षाची वैचारिक आणि संघटनात्मक एकजूट निर्माण करण्याचे आव्हान असेल. या सगळ्या घडामोडींमध्ये भाजपची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे. राष्ट्रवादीचा अजित पवार गट हा महायुतीचा घटक असल्याने त्यातील संभाव्य अस्थिरता सत्तेच्या गणितांवर परिणाम करू शकते. भाजपला मित्रपक्षांची ताकद हवी असते; मात्र मित्रपक्ष स्वतंत्र राजकीय अस्तित्व आणि महत्त्वाकांक्षा घेऊन पुढे जाऊ लागला की संघर्षाचे नवे पदर उलगडतात. त्यामुळे राष्ट्रवादीतील अस्वस्थता ही केवळ एका पक्षाची अंतर्गत समस्या राहणार नाही. त्याचे पडसाद महायुतीच्या राजकारणातही उमटू शकतात. विशेषतः आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक आमदाराचे राजकीय वजन महत्त्वाचे ठरणार आहे. राऊत यांच्या विधानाकडे पाहताना त्यांच्या राजकीय शैलीचाही विचार करावा लागेल. सत्ताधाऱ्यांवर सातत्याने हल्लाबोल करणे, राजकीय घडामोडींचे संकेत देणे आणि विरोधकांच्या गोटातील अस्वस्थता सार्वजनिक चर्चेत आणणे ही त्यांची खासियत आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक विधानाला राजकीय संदर्भ असतो. परंतु यावेळी त्यांनी थेट २० ते २२ आमदारांचा आकडा सांगितल्याने चर्चेला अधिक धार आली आहे. हा आकडा प्रत्यक्षात कितपत खरा ठरतो, कोणते आमदार पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत आणि त्यांचा पुढील राजकीय प्रवास कोणत्या दिशेने असेल, हे येणारा काळच स्पष्ट करेल. महाराष्ट्राच्या राजकारणात पक्ष फुटतात, पुन्हा एकत्र येतात आणि सत्तेच्या नव्या समीकरणांसाठी जुन्या शत्रूशीही हातमिळवणी करतात. मात्र, प्रत्येक फुटीमागे सत्तेची आकांक्षा असतेच असे नाही; कधी नेतृत्वाचा अभाव, कधी निर्णयप्रक्रियेतील नाराजी, तर कधी राजकीय अस्तित्वाचा प्रश्नही त्यामागे असतो.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत नेमके कोणते कारण निर्णायक ठरणार, हा खरा प्रश्न आहे. पवारांच्या राजकारणाने महाराष्ट्राला अनेक राजकीय धक्के दिले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीतील संभाव्य बंडाची चर्चा ही सहजपणे संपणारी नाही. राऊत यांनी टाकलेला राजकीय बॉम्ब प्रत्यक्षात फुटतो की केवळ धुराचे लोट निर्माण करून शांत होतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मात्र, एक गोष्ट स्पष्ट आहे, राष्ट्रवादी काँग्रेससमोर सध्या केवळ पक्ष टिकवण्याचे नव्हे, तर नेतृत्व, निष्ठा आणि राजकीय अस्तित्व टिकवण्याचे मोठे आव्हान उभे आहे.

- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.
मु.पो.मासा बेलेवाडी
कागल-कोल्हापूर

मुंडा

षोडश कोवळे वर्षी
आग पेटली धडाडा
काळ्या पारतंत्र्यात
वीजा चमके तडाडा

इतिहास रचियीता
शूरोत्तम बिरसामुंडा
अठराव्या शतकात
लहरे क्रांतीचा झेंडा

तोडून टाके शृंखला
मिशनरी क्रुर गराडा
झोकले जनसेवेमधे
संसार केला चुराडा

दारिद्र्य चोहीकडे रे
महाग झाला दमडा
सोसून हाल अपेष्टा
घट्ट झालेला चमडा

इंग्रजांना झोंबलेला
झण झणीत खरडा
शस्त्रास्त्रे नसे काही
विरोध केला करडा

भूमीस प्रसव वेदना
रे पर्णे फुटली झाडा
आदिवासी भगवंत
स्वप्नवत समोर खडा

– हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

किन्होळा येथे २००६-२००७ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न...



अक्षराज : प्रतिनिधी

दि.१५, किन्होळा (बुलढाणा) : श्री शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, किन्होळा येथील सन २००६-२००७ च्या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा (गेट-टुगेदर) दि.१२ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या मेळाव्यासाठी तब्बल १९ वर्षांनंतर सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी एकाच छताखाली एकत्र आले. शाळेच्या स्व. डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख रंगमंचावर आयोजित या कार्यक्रमात जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य जी. एच. राजपू, ई.एन. बाहेकर, एस.डी. बाहेकर, चव्हाण सर, परिहार सर, पवार सर, इंगळे सर यांच्यासह इतर गुरुजन उपस्थित होते.

सुरुवातीला विद्यालयाच्या वतीने प्राचार्य श्री राजपूत सर व वर्गशिक्षक परिहार सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन शालेय परिसरात स्वागत केले.

त्यानंतर कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले.

प्रत्येकाने आपापला परिचय करून देत शाळेतील गमतीशीर किस्से सांगितले. शाळेतील खोड्या, शिक्षकांचा धाक, अभ्यासाचा ताण आणि मैत्रीच्या आठवणींनी वातावरण भारावून गेले. अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करताना भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी व गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी नेहमी पुढाकार घेण्याचा संकल्प केला. उपस्थित गुरुजनांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जवळपास सर्वच विद्यार्थी उपस्थित होते.

शहापूर कार्निवलच्या तारखांवर शिक्कामोर्तब! ३ ते ६ डिसेंबरदरम्यान रंगणार भव्य सोहळा



अक्षराज : सुनिल फर्डे

दि.१५, शहापूर (ठाणे) : शहापूरकरांसाठी आनंदाची बातमी! मनोरंजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध आकर्षणांची मेजवानी घेऊन येणाऱ्या बहुप्रतीक्षित 'शहापूर कार्निवल' च्या तारखा अखेर निश्चित झाल्या आहेत. येत्या ३ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत शहापूर तालुक्यातील हा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात रंगणार आहे.

शहापूर तालुक्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि मनोरंजन क्षेत्रात नवा उत्साह निर्माण करणाऱ्या या कार्निवलचे नियोजन शहापूरचे ज्येष्ठ पत्रकार रवींद्र लकडे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले आहे. स्थानिक नागरिकांना एकाच व्यासपीठावर मनोरंजन, कला, संस्कृती आणि विविध उपक्रमांचा आनंद घेता यावा, या उद्देशाने या सोहळ्याची आखणी करण्यात आली आहे. चार दिवस चालणाऱ्या या भव्य आयोजनामुळे शहापूरच्या उत्सवी वातावरणात भर पडणार असून, तालुक्यातील नागरिकांसह तरुणाई, महिला आणि बालकांनाही या सोहळ्याची विशेष पर्वणी मिळणार आहे.

शहापूरच्या लौकिकात भर घालणारा आणि तालुक्याच्या सांस्कृतिक ओळखीला नवी झळाळी देणारा हा कार्निवल नेमका कोणकोणत्या आकर्षणांनी सजणार, याबाबत नागरिकांमध्ये आतापासूनच उत्सुकता निर्माण झाली आहे.

जुन्या थकबाकीतून मुक्त व्हा – टोरेंट पॉवरचे ग्राहकांना आवाहन



अक्षराज : विनोद वास्कर

दि.१५, शिळफाटा (ठाणे) : महावितरणची दीर्घकाळ प्रलंबित वीजबिल थकबाकी असलेल्या ग्राहकांसाठी अभय योजना २०२६-२७ जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेऊन ग्राहकांनी जुन्या थकबाकीचा सवलतीत निपटारा करावा, असे आवाहन टोरेंट पॉवरच्या वतीने करण्यात आले आहे.

या योजनेमुळे ग्राहकांना व्याजमाफी, मूळ थकबाकीवर विशेष सवलत आणि सुलभ हप्त्यांमध्ये रक्कम भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

योजनेचा कालावधी : ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७

महावितरणची थकबाकी असलेले पात्र ग्राहक या योजनेचा लाभ घेऊ शकतात. याअंतर्गत थकबाकीवरील लागू व्याजावर १०० टक्के माफी देण्यात येणार असून, पात्र ग्राहकांना व्याजमुक्त हप्त्यांमध्ये थकबाकी भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, १५ डिसेंबर २०२६ पूर्वी एकरकमी थकबाकी भरणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या ग्राहक श्रेणी आणि थकबाकीच्या कालावधीनुसार मूळ थकबाकीवर १० ते २० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त सवलत मिळू शकते. त्यामुळे ग्राहकांना आर्थिक दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

ज्या ग्राहकांचे नवीन वीजजोडणी, नावबदल, वीजदर श्रेणीतील बदल, वीजभार बदल किंवा इतर वीजविषयक अर्ज जुन्या महावितरण थकबाकीमुळे प्रलंबित आहेत, त्यांनीही या योजनेचा लाभ घ्यावा.

ही मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध असलेली विशेष संधी असून, पात्र ग्राहकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता थकबाकीचा निपटारा करावा. अधिक माहितीसाठी टोरेंट पॉवरच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बालदिनानिमित्त डहाणू पोलिसांची विद्यार्थ्यांना अनोखी शाळा!

अक्षराज : निलेश कासट

दि.१५, डहाणू (पालघर) : बालदिनाचे औचित्य साधून डहाणू पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करण्यासह कायद्याचे प्राथमिक ज्ञान, आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांची मदत घेण्याची पद्धत आणि पोलीस दलाच्या कामकाजाची माहिती करून देण्याचा या उपक्रमामागील उद्देश होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना ११२ या आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकाची माहिती देण्याबरोबरच पोलीस दलाकडून वापरण्यात येणाऱ्या तीन प्रकारच्या बंदुकांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम विशेष आकर्षणाचा ठरला.

१४ नोव्हेंबर रोजी आयोजित या कार्यक्रमात गंजाड आश्रमशाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच म हाविद्यालयीन वयोगटातील युवक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. डहाणू पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक दत्ता शेळके यांच्यासह पोलीस ठाण्यातील अन्य अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात सुरक्षित राहण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, अनोळखी व्यक्तींशी संवाद साधताना कसे सतर्क राहावे, शाळेत ये-जा करताना सुरक्षिततेचे नियम कसे पाळावेत, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कोणत्याही संकटाच्या वेळी घाबरून न जाता प्रसंगावधान राखून योग्य पद्धतीने मदत कशी मागावी, याचेही महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत मिळावी यासाठी उपलब्ध असलेल्या ११२ या हेल्पलाइन क्रमांकाची विशेष माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. अपघात, मारहाण, छेडछाड, महिलांवरील अत्याचार, जीवितास धोका किंवा अन्य गंभीर आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास ११२ क्रमांकावर संपर्क साधून पोलिसांची मदत घेता येते, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मदतीसाठी फोन करताना आपले ठिकाण, घडलेली घटना आणि परिस्थितीची आवश्यक माहिती स्पष्टपणे सांगणे गरजेचे असल्याचेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पोलीस दलाकडून वापरण्यात येणाऱ्या शस्त्रास्त्रांची विद्यार्थ्यांना करून देण्यात आलेली प्रत्यक्ष ओळख. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस विभागाकडे असलेल्या तीन प्रकारच्या बंदुका विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या. या बंदुकांची रचना, त्यांचा उपयोग, कार्यपद्धती आणि पोलीस दलातील त्यांचे महत्त्व याविषयी अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली.

शस्त्रास्त्रांचा वापर करताना घ्यावयाची खबरदारी, त्यासंबंधीचे सुरक्षिततेचे नियम आणि केवळ प्रशिक्षित व अधिकृत पोलीस कर्मचाऱ्यांनाच शस्त्रे हाताळण्याचा अधिकार असल्याचेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. प्रत्यक्ष बंदुका पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. या माध्यमातून पोलीस दलातील शिस्त, जबाबदारी आणि कर्तव्याची जवळून माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

बालदिनाला सुरक्षिततेचा संदेश!

बालदिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ पोलीस दलाच्या कामकाजाची माहिती मिळाली नाही, तर स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहण्याचा महत्त्वपूर्ण संदेशही देण्यात आला. शालेय जीवनापासूनच कायद्याचा आदर, सामाजिक जबाबदारी, प्रसंगावधान आणि संकटसमयी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित व्हावी, या दृष्टीने डहाणू पोलिसांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. बालदिनाच्या निमित्ताने पोलिसांनी विद्यार्थ्यांशी साधलेला हा थेट संवाद त्यांच्या ज्ञानात आणि सुरक्षिततेच्या जाणीवेत भर घालणारा ठरला.

महिला पोलिस पाटलांचा सामाजिक बांधिलकीचा आदर्श !

स्वखर्चातून गावात ४० पथदिवे आणि सीसीटीव्ही कॅमेरे

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१५, पालम (परभणी) : प्रशासकीय जबाबदारी पार पाडतानाच सामाजिक बांधिलकी जपत उमरथडी येथील महिला पोलिस पाटील ज्योती शिवप्रसाद दुधाटे यांनी ग्रामसुरक्षेसाठी कौतुकास्पद पुढाकार घेतला आहे. गावातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासह ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून संपूर्ण गावात ४० विद्युत दिवे आणि गावातील तीन महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. त्यांच्या या उपक्रमामुळे गावातील अंधार दूर होण्यासोबतच ग्रामसुरक्षेलाही मोठे बळ मिळाले आहे.



सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामीण भागात विविध समस्या निम र्ण झाल्या आहेत. त्यातच चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी गावातील अंधाराचा फायदा घेऊन चोरी किंवा अन्य गैरप्रकार घडण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन ज्योती दुधाटे यांनी केवळ आपल्या पदाच्या जबाबदारीपुरते मर्यादित न राहता गावाच्या सुरक्षिततेसाठी स्वतः पुढाकार घेतला.

याअंतर्गत गावातील विविध भागांत ४० विद्युत दिवे बसवून संपूर्ण परिसर प्रकाशमय करण्यात आला आहे. तसेच गावातील तीन महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, तसेच चोरीसारख्या घटनांना आळा घालण्यास आणि अनुचित प्रकार घडल्यास तपासात मदत होणार आहे.

शासकीय पदाची जबाबदारी पार पाडतानाच स्वतःच्या खर्चातून गावाच्या हितासाठी केलेला हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी आहे. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणाऱ्या महिला पोलिस पाटील ज्योती शिवप्रसाद दुधाटे यांच्या या कार्याचे उमरथडीसह संपूर्ण पालम तालुक्यातून कौतुक होत आहे.

कामोठेतील ४ कोटींचे समाजसेवा केंद्र नागरिकांसाठी खुले करा; प्रहार संघटनेची मागणी

अक्षराज : अभिनव येलवे

दि.१५, पनवेल : कामोठे शहरातील नागरिकांना मंगलकार्य, सामाजिक कार्यक्रम, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी हक्काचे सभागृह उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सिडकोने सेक्टर २१ येथे सुमारे चार कोटी रुपये खर्च करून उभारलेले बहुउद्देशीय समाजसेवा केंद्र गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन हे केंद्र तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी प्रहार संघटनेच्या वतीने पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कामोठे शहराचा विस्तार होत असताना नागरिकांना विवाहसोहळे, मंगलकार्य आणि सामाजिक उपक्रमांसाठी खासगी सभागृह भाड्याने घ्यावे लागत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी नागरिकांनी सिडकोकडे समाजसेवा केंद्राची मागणी केली होती. त्यानुसार सिडकोने सेक्टर २१ येथे या बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम २०१८ मध्ये पूर्ण केले. म ात्र, बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली तरी पनवेल महानगरपालिकेकडून हे केंद्र नागरिकांसाठी खुले करण्यात आलेले नाही. दरम्यान, या इमारतीमध्ये महानगरपालिकेने वैद्यकीय सेवा केंद्र आणि डेटा सेंटर सुरू केले असल्याची माहिती समोर आली आहे.



एकता सामाजिक संस्थेसह विविध संस्था व संघटनांनी गेल्या पाच वर्षांपासून हे समाजसेवा केंद्र नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी सिडको आणि पनवेल म हानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्यापही या मागणीची पूर्तता झालेली नसल्याने नागरिकांम ध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेच्या शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले आणि समाजसेवा केंद्राचे लोकार्पण करून ते नागरिकांसाठी तातडीने खुले करण्याची मागणी केली.

या इमारतीमध्ये नागरिकांच्या विविध गरजा लक्षात घेऊन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तळमजल्यावर ग्रीन रूम, कार्यालय, स्वयंपाकगृह आणि बहुउद्देशीय सभागृह आहे. पहिल्या मजल्यावर सांस्कृतिक वर्ग, लहान मुलांसाठी कार्यशाळा तसेच डॉक्टरांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था आहे. तर दुसऱ्या मजल्यावर इनडोअर खेळ, वाचनालय आणि कार्यशाळेसाठी जागा उपलब्ध आहे. एवढ्या मोठ्या खर्चातून उभारलेली इमारत नागरिकांच्या उपयोगासाठी उपलब्ध नसल्याने सार्वजनिक निधीचा अपेक्षित उपयोग होत नसल्याचा मुद्दाही यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

या मागणीची दखल घेऊन महानगरपालिकेने समाजसेवा केंद्र लवकरात लवकर सुरू करावे, अन्यथा येत्या २ डिसेंबर रोजी आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा रायगड जिल्हा प्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिला आहे. यावेळी शिष्टमंडळात ॲड. अजय तापकीर (संपर्कप्रमुख), ॲड. मनोज टेकाडे (अध्यक्ष, विद्यार्थी संघटना), अजय कदम, राहुल तेलंग, पंकज मोहिते आणि अभिनव येलवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दिव्यात नगरसेवक शैलेश पाटील यांच्याकडून लाडक्या बहिणींना भाऊबीज भेट

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१५, दिवा (ठाणे) : भाऊ-बहिणीच्या प्रेमळ नात्याचा सण असलेल्या भाऊबीजनिमित्त दिवा शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात शनिवारी भाऊबीजेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी दिव्यातील शेकडो महिलांनी लाडक्या दादांना भाऊबीजेचे औक्षण करण्यासह मोठी गर्दी केली होती.



नगरसेवक शैलेश पाटील यांच्याकडून दरवर्षी रक्षाबंधन आणि भाऊबीज हे सण म हिलांसोबत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दोन्ही सणांची दिव्यातील महिला भगिनी आतुरतेने वाट पाहत असतात.

भाऊबीजेच्या निमित्ताने कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक बहिणीचे औक्षण स्वीकारत शैलेश पाटील यांनी त्यांना साडी भेट देऊन भाऊबीजेची ओवाळणी दिली. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे शैलेश पाटील आणि दिव्यातील महिला भगिनी यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निम र्ण झाले आहे. भाऊबीजेच्या निमित्ताने झालेल्या या कार्यक्रमाला दिव्यातील शेकडो महिला भगिनींची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाला दिव्यातील शेकडो महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अक्षराज

जिल्ह्यातील पहिल्या तारांगणामुळे शहापूर होणार 'डार्क स्काय झोन'; जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन

अक्षराज : जे.के.पोळ

दि.१५, ठाणे : जिल्ह्यातील पहिले अत्याधुनिक तारांगण आणि मोठ्या दुर्बिणींनी सज्ज असणारी 'सॅपो' (SAPO) वेधशाळा सध्या खगोलप्रेमींच्या केंद्रस्थानी आली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी नुकतीच एक विशेष भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांच्यासोबत स्थानिक आमदार दौलतराव दरोडा, तहसिलदार परमेश्वर कासुळे आणि खगोल अभ्यासक दा.कृ. सोमण प्रामुख्याने उपस्थित होते. या मान्यवरांनी संपूर्ण रात्रभर दुर्बिणीच्या माध्यमातून आकाशातील ताऱ्यांचे व ग्रहगोलांचे केलेले थेट निरीक्षण हा या भेटीचा मुख्य आकर्षण बिंदू ठरला.

रात्रभर केले खगोलीय घटकांचे अचूक निरीक्षण

प्रकल्पाच्या संचालकांनी पाहुण्यांचे स्वागत केल्यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनी खगोलशास्त्राचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी मोठ्या दुर्बिणीतून घेतलेल्या रात्रीच्या निरिक्षणात सौरडाग, सौर ज्वाला, शनीची कड्यांची वलये, गुरू ग्रहाचे चार प्रमुख चंद्र, शुक्र ग्रह तसेच आकाशगंगेतील इतर अद्भूत गोष्टींचा सखोल अभ्यास केला. या तारांगणातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शोध पाहून त्यांनी मनःपूर्वक आनंद व्यक्त केला. विशेष म्हणजे, या अनोख्या खगोल महोत्सवात ठाणे जिल्हा परिषद शाळेतील काही होतकरू विद्यार्थी आणि शिक्षकही मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांमध्ये खगोलविज्ञानाची गोडी आणि अंधश्रद्धा निर्मूलन

या प्रकल्पाच्या माध्यमातून ठाणे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांनाही आता खगोलविज्ञानाचे धडे प्रत्यक्ष अनुभवता येणार आहेत.

या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची आणि खगोलविज्ञानाची खरी गोडी निर्माण होईल, तसेच समाजातील अंधश्रद्धा दूर होण्यास मोठी मदत होईल, असा ठाम विश्वास व्यक्त केला. शहापूर हे खगोलप्रेमींसाठी एक उत्तम केंद्र बनू शकेल, असा आशावाद त्यांनी यावेळी बोलून दाखवला.

शहापूर होणार 'डार्क स्काय झोन'!

ज्येष्ठ खगोल अभ्यासक दा.कृ. सोमण यांनी आपल्या मार्गदर्शनात आकाशदर्शन छंदाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, शहापूर परिसराला महाराष्ट्र सरकारने 'डार्क स्काय झोन' (Dark Sky Zone) म्हणून घोषित करावे आणि या प्रकल्पापर्यंत जाणारा रस्ता रुंद करावा, अशी मागणी केली.

यावर सकारात्मक प्रतिक्रिया देत जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी शहापूरला 'डार्क स्काय झोन' घोषित करण्यासाठी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन दिले.तसेच 'सॅपो' प्रकल्पाला



प्रशासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही दिली.

आमदार दौलतराव दरोडा यांनीही या प्रकल्पाच्या विकासासाठी आणि पर्यटकांच्या सुविधेसाठी रस्ता रुंदीकरण तातडीने मार्गी लावले जाईल, असे सांगितले.

प्रेक्षणीय 'सॅपो' प्रकल्पाची पार्श्वभूमी

शहापूरचे निलेश ठाकूर, गिरीश ठाकूर आणि राज छेडा या तरुण संचालकांनी उभा केलेला हा 'सॅपो' प्रकल्प खगोलप्रेमींसाठी एक पर्वणीच ठरत आहे. पावसाळ्यापूर्वी आमदार दौलतराव दरोडा आणि दा.कृ. सोमण यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले होते. खगोलशास्त्राचा प्रसार करण्यासाठी दा.कृ. सोमण आपले मौल्यवान ग्रंथ या प्रकल्पाला देणगी म्हणून देणार आहेत.

जिल्ह्यातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबासह या विज्ञानप्रेमी प्रकल्पाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन प्रशासकीय अधिकारी आणि आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

थोडक्यात बातम्या

जनजातीय गौरव दिवस व भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

अक्षराज : नंदकुमार बोरसे



दि.१५, शिरपूर (धुळे) : शिरपूर येथे आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, जल-जंगल-जमिनीच्या संरक्षणासाठी आणि समाजाच्या स्वाभिमानासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध निर्भीडपणे लढा देणारे महान क्रांतिकारक, जननायक भगवान बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम शिरपूर चे आमदार काशीराम पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. जननायक भगवान बिरसा मुंडा यांचे अद्वितीय कार्य, त्याग, संघर्ष आणि राष्ट्रभक्तीचा विचार सदैव समाजाला प्रेरणा देत राहील. भगवान बिरसा मुंडा यांचा संघर्षमय जीवनप्रवास हा अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणारा अमूल्य वारसा आहे. यानिमित्त शिरपूर येथील आमदार कार्यालयात जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती व जनजातीय गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिरपूर आमदार काशीराम पावरा, धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी यांच्यासह उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेला संघर्ष, स्वाभिमान, एकता आणि समाजहिताचा संदेश प्रत्येकासाठी सदैव प्रेरणादायी राहील.

पेणमध्ये ५० हजारांची लाच घेताना दुय्यम निबंधक एसीबीच्या जाळ्यात

अक्षराज : मितेश जाधव

दि.१५, पेण (रायगड) : पेण शहरात असणाऱ्या दुय्यम निबंधक (रजिस्टर्ड) कार्यलयाचे प्रमुख जगदाले यांनी फिर्यादी कडून त्याचे काम करण्याच्या बदल्यात खंडणी मागितल्याने त्यास ठाणे येथील लाच लुचपत प्रतिबंध अधिकाऱ्यांनी पेण येथे दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी रंगेहाथ पकडले. पेण येथील लोकसेवक तथा दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी जगदाळे नोंदणी प्रक्रियेच्या संदर्भात ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) जाळ्यात पकडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

याच प्रकरणात यापूर्वीही काही रक्कम त्यांनी स्वीकारली होती व परत दुसरा टप्पा रक्कम ५० हजार स्वीकारताना त्यास अटक करण्यात आली. या प्रकरणी रात्री उशिरा पर्यंत कारवाई सुरु होती. दोन महिन्यापूर्वीच हें दुय्यम रजिस्ट्रेड अधिकारी पेण कार्यलयात रुजू झाले होते. या कारवाईमुळे सरकारी कार्यालयांतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. सामान्य नागरिकांची शासकीय कामे पारदर्शकपणे आणि वेळेत पूर्ण होणे अपेक्षित असताना, अशा घटनांमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

दिव्यात तीन चारचाकी वाहनांना भीषण आग; अग्निशमन दलाच्या सतर्कतेने टळली मोठी दुर्घटना

अक्षराज : विनोद वास्कर



दि.१५, दिवा (ठाणे) : दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६:३७ वाजता दिवा (पूर्व) येथील आगासन रोडवरील एस.एम.जी. शाळेसमोर उभ्या असलेल्या ३ चारचाकी वाहनांना अचानक आग लागल्याची घटना घडली. या भीषण आगीची माहिती मिळताच शिळ अग्निशमन केंद्राचे स्थानक अधिकारी व जवान १ फायर वाहन आणि १ रेस्क्यू वाहन घेऊन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्यासोबत मुंब्रा पोलीस स्थानकाचे पोलीस कर्मचारी ही परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तत्परतेने उपस्थित होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत सकाळी ७:४५ वाजताच्या सुमारास ही आग पूर्णपणे विझविली, त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला असून सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे.

या आगीच्या दुर्घटनेत रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या तीन वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये मालक अज्ञात असलेली ह्युंदाई औरा (MH ०५ EJ ५९७६) ही कार पूर्णपणे जळून खाक झाली आहे, तर मारुती सुझुकी वॅगन आर (MH ०३ ES १४२८) या कारचे किरकोळ नुकसान झाले आहे. याशिवाय, आणखी एक अज्ञात कार देखील या आगीत पूर्णपणे जळून गेली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, मात्र अचानक घडलेल्या या आगीच्या सत्रामुळे दिवा परिसरात काही काळ खळबळ उडाली होती.

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे शेतकऱ्यांना आवाहन

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१५, नांदेड : अल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन व जपून वापर करणे आवश्यक आहे. सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी प्राधान्याने चारा पिकांसाठी व सध्या शेतात उभ्या असलेल्या पिकांसाठीच वापरावे. नव्याने ऊस किंवा अधिक पाण्याची आवश्यकता असलेल्या तत्सम पिकांची लागवड टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना केले आहे.जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज, दि. १५ नोव्हेंबर रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी उपलब्ध पाणीसाठा, सिंचनाची आवर्तने, पाणीपुरवठा आणि नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.जिल्ह्यातील काही सिंचन प्रकल्पांमधून उपलब्ध पाणीसाठ्यानुसार सिंचनाची आवर्तने सुरू आहेत. या पाण्याचा वापर केवळ सध्या शेतात उभ्या असलेल्या पिकांसाठी करावा. सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी विहिरी, शेततळी किंवा अन्य खासगी पाणीसाठे भरण्यासाठी वापरू नये. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

राम पडगे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

अक्षराज : प्रतिनिधी

दि.१५, सातारा : श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा, महाराष्ट्राचे अध्यक्ष, इंजिनियर राम पडगे यांना रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सातारा येथे सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा येथे कर्मवीर सभागृहामध्ये अतिभव्य स्वरूपात आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमासाठी खासदार श्रीमंत उदयनराजे भोसले, शंभूराजे देसाई पर्यटन विकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेसोबत या कार्यक्रमासाठी श्रीयुत विवेकानंद पाटील विद्यार्थी चळवळीतील नेते कोल्हापूर हे आवर्जून उपस्थित होते. याशिवाय सातारा जिल्हा व जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र या संस्थेमार्फत समाजाच्या विकासा संदर्भात करण्यात येत असलेल्या कामांची माहिती घेतल्यानंतर स्वतः विवेकानंद पाटील विद्यार्थी चळवळीतील नेते यांनी स्वतः संस्थेचे अध्यक्ष राम पडगे यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराच्या अंतर्गत सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र व शाल बुके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संघटनेचे विविध पदाधिकारी व जिल्ह्यातून असंख्य समाज बांधव उपस्थित होते. पोपटराव भोज सातारा जिल्हा समन्वयक, शिवाजीराव गंधाले सातारा तालुका समन्वयक, संतोष भिसे अध्यक्ष खटाव तालुका तसेच संघटनेचे सन्माननीय सदस्य वृक्षमित्र सतीश दळवी व त्यांचे सोबत अनेक समाज बांधव उपस्थित होते.

या पुरस्काराच्या निमित्ताने राम पडगे म्हणाले की, हा पुरस्कार जिल्हा आणि जिल्ह्यातील बाहेर असंख्य कार्यकर्ते संघटनेच्या माध्यमातून करत असलेल्या सामाजिक कामाची पावती आहे. अत्यंत बिकट परिस्थितीतून अनेक अडचणींना तोंड देत केलेल्या सामाजिक कामाला आज न्याय मिळाला आहे. आजचा हा पुरस्कार फक्त माझा पुरस्कार नसून माझ्यासोबत असणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा पुरस्कार आहे व त्यांचा हा सन्मान आहे. आज संस्थेने भारत सरकारचे सी एस आर - १ प्रमाणपत्र मिळवून एक वेगळी झेप घेतलेली आहे. याचा उपयोग करून अधिकाधिक समाजासाठी काम करण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. आजच्या या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या यानिमित्ताने समाजाच्या विविध स्तरातून इंजिनिअर राम पडगे यांचे अभिनंदन होत आहे.

भगवान बिरसा मुंडा यांचा संघर्ष आणि विचारसंपूर्ण देशासाठी प्रेरणादायी - आ.जोरगेवारन

कोडा येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रम

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१५, चंद्रपूर : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांनी अन्याय आणि शोषणाविरोधात दिलेला लढा हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नव्हता, तर तो जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठीचा स्वाभिमानाचा संघर्ष होता. अत्यंत कमी वयात त्यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात उभारलेला लढा, आदिवासी समाजाच्या अस्मितेसाठी केलेले कार्य आणि समाजाला दिलेली एकजुटीची शिकवण आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

भगवान बिरसा मुंडा यांचे विचार आणि संघर्ष नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासोबतच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, संघटन आणि सामाजिक जागृतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त जय सेवा सल्ला शक्ती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नकोडा येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृहात आयोजित प्रबोधनात्मक कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे महामंत्री नामदेव डाहुले, भाजप तालुकाध्यक्ष विनोद खेवले, ममता मोरे, नकोडा सरपंच किरण बांदुरकर, ऋशी कोवे, विकास मडावी, मंगला



उईके, राहुल कन्नाके, प्रणय कांबळे, ममता उरकुडे, आकाश गेडाम, रोषणी गेडाम, मंगेश राजगीडकर तनुश्री बांदुरकर, ममता उरकुडे आदिंची उपस्थिती होती.

यावेळी आ. जोरगेवार म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजाच्या स्वाभिमानाचे आणि संघर्षाचे प्रतीक आहेत. ब्रिटिश राजवटीतील अन्यायकारक धोरणे, शोषण आणि आदिवासींच्या परंपरागत अधिकारांवरील अतिक्रमणाविरोधात त्यांनी उभारलेला लढा इतिहासात अजरामर झाला आहे.

जल, जंगल आणि जमीन हे आदिवासी समाजाच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. या नैसर्गिक साधनसंपत्तीवरील पारंपरिक हक्क आणि आपल्या संस्कृतीचे संरक्षण करण्यासाठी बिरसा मुंडा यांनी दिलेला लढा आजही आपल्याला अन्यायाविरोधात उभे राहण्याची प्रेरणा देतो.

आदिवासी समाजाचे देशाच्या इतिहासात, संस्कृतीत आणि स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान आहे. मात्र, या समाजाच्या योगदानाची आणि महान परंपरेची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाची संस्कृती, रूढी-परंपरा आणि अस्मिता जपत आधुनिक विकासाच्या प्रवाहातही समाजाने पुढे गेले पाहिजे. यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी माध्यम असून प्रत्येक कुटुंबाने आपल्या मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

शिक्षणातूनच नव्या संधी निर्माण होतील आणि समाजातील तरुण पिढी सक्षम होईल,असेही त्यांनी सांगितले. आदिवासी बांधवांचे हक्क,त्यांना मिळणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ, रोजगाराच्या संधी आणि शिक्षणाच्या सुविधा यासाठी समाजाने जागरूक राहणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी सामाजिक एकजूट, संघटन आणि जागृती महत्त्वाची आहे.

भगवान बिरसा मुंडा यांनी दाखविलेल्या संघर्षाच्या मार्गातून प्रेरणा घेत समाजाच्या प्रगतीसाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे,असे आवाहनही आ. जोरगेवार यांनी केले. भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अशा प्रबोधनात्मक कार्यक्रम ांमधून महापुरुषांचे विचार समाजापर्यंत पोहोचतात आणि नव्या पिढीला आपल्या इतिहासाची जाणीव होते. त्यामुळे अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने होणे आवश्यक असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

सदर कार्यक्रमाला समाज बांधव अणि गावक-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.